N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** अहमदपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0107 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**15/02/2024 01:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 14/02/2024

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/02/2024

**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/02/2024 **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/02/2024 01:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर परिशद, अहमदपुर ,अहमदपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सिध्देश्वर उर्फ निखील संजय कासनाळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मारवाडी गल्ली ता अहमदपुर,अहमदपुर,अहमदपूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मारवाडी गल्ली ता अहमदपुर,अहमदपुर,अहमदपूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420291863

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | काकासाहेब सिध्देश्वर डोईफोडे | | | 1. म्हैसगाव ता माढा जि सोलापुर, माढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | अजय विजयकुमार कस्तुरे | | | 1. मोती नगर, कन्हेरी रोड, बोरा , कापड षपच्या बाजुस, लातूर, लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रूपये दराच्या 1000 भारतीय चलनी नोटा | 500,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 15/02/2024
फिर्याद

मी सिध्देश्वर उर्फ निखील संजय कासनाळे, वय 32 वर्षे, व्यवसाय वकीली/षेती, रा. मारवाडी गल्ली ता. अहमदपुर जि. लातूर मो.नं. 9420291863.
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी दिनांक 13/02/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांची कार्यालयात जावुन भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितली. त्यांनी मला उदया दिनांक 14/02/2024 रोजी रिंगरोड, अहमदपुर येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले.
त्याप्रमाणे मी आज दिनांक 14/02/2024 रोजी सकाळी 09.30 वा. सुमारास वरील प्रमाणे सं◌ागितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करुन देवुन माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.
"मी वरीलप्रमाणे राहणार असुन वकीली/षेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझी मौजे मरषिवणी, ता. अहमदपुर जि. लातूर येथील सर्व्हे नं.56 मधील 3600 चौरस मीटर क्षेत्रास वाणिज्य प्रयोजनार्थ जमीन विकासाची प्राथमीक परवानगी प्राप्त झालेली असुन त्यामध्ये अंतिम परवानगी मिळणेकरीता नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर येथे दाखल केलेल्या प्रकरणामध्ये दि.25/10/2023 रोजी ऑनलाईन चलनाचा भरणा केलेला आहे. माझे प्रलंबीत कामाकरीता मी दि.05/02/2024 रोजी नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर येथे संबंधीत लोकसेवकाकडे गेलो असता, त्यांनी माझे वरीलप्रमाणे दाखल प्रकरणामध्ये अंतिम परवानगी देण्याचे कामासाठी म्हणुन संबंधीत नगररचनाकार यांनी स्वतःसाठी व मुख्याधिकारी, नगरपरिशद, अहमदपुर यांचेसाठी असे मिळुन एकुण 7,00,000 /-रू. लाचेची मागणी केली आहे. संबंधीत लोकसेवक यांना लाच देण्याची माझी इच्छा नसुन माझा त्यांचेषी कसलाही आर्थिक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही अथवा माझे त्यांचेषी काही वैर नाही.'' अषा आषयाची मी दिलेली तक्रार पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.
पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर येथील नगररचनाकार श्री अजय कस्तुरे व मुख्याधिकारी श्री काकासाहेब डोईफोडे यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 12◌:03 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात अडकवुन दिले. त्यानंतर मी व पंच क. 01 घुगे असे

मिळुन मेन रोडवरील नगरपरिशद कार्यालय, अहमदपुर येथील कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील गाळा नं.27 मध्ये गेलो. तेथे निळसर रंगाचा फुल षर्ट व नेव्ही ब्लु रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती या नगररचनाकार श्री कस्तुरे असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता मी माझ्◌ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष लोकसेवक कस्तुरे यांचेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी म्हणालो... नमस्कार सर...त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले... मग निखील भाऊ...बाकीची फीस भरून घ्या म्हणुन सांगीतले.... त्यावर मी म्हणालो...नाही सात लाख काही होईनात म्हणलं... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले...हं... त्यावर मी म्हणालो... पाच लाख देतो... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले...बरं... त्यावर मी म्हणालो... साहेबांचे... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले...बघा की...त्यावर मी म्हणालो... किती?... कस?...त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले...बघतो एकदा...चला मग साहेबांकड जावुन क्लीअर करूत... त्यावर मी म्हणालो... आता आपलं काय साहेब... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले...ले आऊटच ना....आज नाही उद्या होवुन जाईल...आता फॉरवर्ड करून टाकतो... त्यावर मी म्हणालो... हं...त्यानंतर मी व लोकसेवक कस्तुरे असे मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये गेलो. तेथे मी म्हणालो... नमस्कार सर...लोकसेवक मुख्याधिकारी डाईफोडे म्हणाले.... काय मग... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले... ती थोडं जास्त व्हायलय म्हणलालते त्यनी पेमेंट... त्यावर लोकसेवक मुख्याधिकारी डाईफोडे म्हणाले.... बर... किती सांगीतल होत... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले... सात लाख... त्यावर मी म्हणालो... सात लाख मधी केलं होत... पाच लाख रूपय देतो आता... त्यावर लोकसेवक मुख्याधिकारी डाईफोडे म्हणाले...करून घे जास्त चर्चा करायची नसल्यात असली....आजच करून टाका... त्यावर मी म्हणालो... हो.... आज उद्या मधी होईल की करून... त्यावर लोकसेवक मुख्याधिकारी डाईफोडे म्हणाले...हो...असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 घुगे असे कार्यालयातून निघून बाहेर येवुन सापळा पथकाच्या वाहनाजवळ 12◌:44 वाजताचे सुमारास गेलो◌ असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 घुगे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लोकसेवक कस्तुरे व लोकसेवक डोईफोडे यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 घुगे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌ यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझ्यात व लोकसेवक कस्तुरे व लोकसेवक डोईफोडे यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 घुगे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करून लोकसेवक कस्तुरे यांनी सुरूवातीस माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 7,00,000/-रू. ची मागणी केली असुन त्यानंतर मी मुख्याधिकारी श्री डोईफोडे यांचेकडे पडताळणीकामी गेलो असता त्यांनी देखील मला 7,00,000/-रुपये लाचेची स्वतः स्पश्ट मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने मी त्यांना 5,00,000/-रूपये आणुन देतो व उर्वरीत 2,00,000/-रू. नंतर देतो असे सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 5,00,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांनी मला लोकसेवक कस्तुरे व लोकसेवक डोईफोडे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 1000 भारतीय चलनी नोटा असे एकुण 5,00,000/-रुपये समक्ष हजर केले.

त्यावेळी पोलीस निरीक्षक भास्कर पुन्नी साहेब यांनी मला व पंचाना अ◌ॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1687 जाधव यांनी अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावुन माझे चारचाकी वाहनाचे ड्रायव्हरच्या बाजुच्या सीटसमोरील कप्प्यामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर पाण्याची बाटली काढून गाडीबाहेर टाकणेबाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 16◌:19 वा. चालु करुन माझ्या गळ्यात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 घुगे असे नगरपरिशद कार्यालयाबाहेर थांबुन नगररचनाकार कस्तुरे यांना फोनवरून कॉल करून म्हणालो... साहेब इथं आललो पार्किंगला खाली... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले.... आलो... त्यावर मी म्हणालो. हो... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले.... गाडीत हायतं का कुणीकड हायत...इकडच चलता का... त्यावर मी म्हणालो. चलतं इथचं.... असे म्हणून त्यांनी माझे चारचाकी क्रेटा वाहनाचे ड्रायव्हरच्या बाजुच्या सीटवर बसले. तेव्हा मी सीटसमोरील कप्प्यामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम त्यांचेसमोर धरली असता, लोकसेवक कस्तुरे म्हणाले....पिषवी हाय का?...त्यावर मी म्हणालो... पिषवी नाही... बघतो एखादी हायका...साहेब उगं चिडचिड करलालेत वाटालय... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले.... काय होतयं... असे म्हणुन मी त्यांच्या समोर धरलेली अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 5,00,000/-रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 1000 भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम लोकसेवक कस्तुरे यांनी अंदाजे 16.30 वा. चे

सुमारास स्वतःचे हाताने स्वीकारुन पिषवीमध्ये भरली. त्यावर मी म्हणालो... हायवेला प्रॉपर्टी आल्याय कर्मषिअल
त्यच्यामुळे.... थोडं लोकाच्या नजरा हायत... काय सांगाव... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले....बाकीचे मग
सोमवारी.... त्यावर मी म्हणालो...हो... लवकर करुन द्या तेवढे... त्यावर लोकसेवक कस्तुरे म्हणाले....हो झालं की
देवुन टाकतों... त्यावर मी म्हणालो...हो..हो...सर ती 3600चं पण करा की ती आपल 36 चौ.मी.... त्यावर
लोकसेवक कस्तुरे म्हणाले....ती बी करुन देतों... त्यावर मी म्हणालो...हो हो... सॉरी 56 सर्व्हे नंबर....असे म्हणून
त्यांनी न्यु विठ्ठल, न्यु जीन्स सीडस् लिहलेली व त्यावर हॅब्रीड कणसाचे पिकाचे छायाचित्र असलेले पिषवीत लाचेची
रक्कम रू.5,00,000/- ठेवुन ती पिषवी त्यांचे नगरपरिशद, अहमदपुर येथील पहिल्या मजल्यावरील गाळा नं. 27
मध्ये असलेल्या कार्यालयात घेवुन गेले. त्यानंतर मी गाडीतुन पाण्याची बाटली बाहेर खाली टाकुन नियोजीत
लाचस्विकृतीचा इषारा केला. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब व पंच क्रमांक 2 भोसले व सापळा पथकातील सदस्य
सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले.
त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 1 घुगे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत
विचारणा केली असता पंच क्रमांक 1 घुगे यांनी समोर निळसर रंगाचा फुल षर्ट व नेव्ही ब्लु रंगाची पॅन्ट घातलेली
व्यक्ती या लोकसेवक नगररचनाकार श्री कस्तुरे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर
स्विकारुन माझे खाजगी वाहनामध्ये स्वीकारुन स्वतःचे हाताने न्यु विठ्ठल, न्यु जीन्स सीडस् लिहलेली व त्यावर
हॅब्रीड कणसाचे पिकाचे छायाचित्र असलेले पिषवीत ठेवुन ती पिषवी त्यांचे पहिल्या मजल्यावरील कार्यालयात घेवुन
गेलेबाबत सांगीतले. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 घुगे यांनी
सांगीतली. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लोकसेवक कस्तुरे यांना दाखवून
त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव अजय विजयकुमार, वय 55 वर्शे पद-नगर रचनाकार ने.
नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर रा. मोतीनगर, कन्हेरी रोड, बोरा षॉपच्या पाठीमागे, लातूर असे असल्याचे
सांगितले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 2 भोसले यांचे हस्ते लोकसेवक श्री कस्तुरे यांच्या जवळील
लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 घुगे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या
नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. लोकसेवक कस्तुरे यांना
ताब्यात घेवुन लोकसेवक मुख्याधिकारी श्री डोईफोडे हे कार्यालयात हजर नसल्याची माहिती मिळाल्याने पंचासमक्ष
लोकसेवक कस्तुरे यांचेकडुन माहिती घेतली असता, लोकसेवक श्री डोईफोडे हे षिवलिंग षिवाचार्य महाराजांचे
भक्तीस्थळी स्थळपाहणी करीता गेले असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे
षासकीय पंच व सापळा पथकासह सदर कार्यक्रमस्थळी जावुन लोकसेवक मुख्याधिकारी श्री डोईफोडे यांना ताब्यात
घेतले. त्यानंतर नगररचनाकार कस्तुरे व मुख्याधिकारी डोईफोडे यांना नगरपरिशद कार्यालय, अहमदपुर येथे आणुन
तक्रारदार यांचे प्रलंबीत कामाचे कागदपत्रे लोकसेवक कस्तुरे यांचेकडुन ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा
कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणे करीता नगरचनाकार कस्तुरे व
मुख्याधिकारी डोईफोडे यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून पोलीस स्टेषन अहमदपुर येथे येवून पुढील
कार्यवाही पुर्ण केली.
तरी यातील 1) काकासाहेब सिध्देष्वर डोईफोडे, वय 39 वर्शे, व्यवसाय-नोकरी, पद-मुख्याधिकारी, वर्ग-1 ने.
नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर रा. म्हैसगाव ता. माढा जि. सोलापुर, सध्या रा. पाण्याची टाकीजवळ, टेंभुर्णी
रोड, अहमदपुर. 2) अजय विजयकुमार कस्तुरे, वय 55 वर्शे, व्यवसाय-नोकरी, पद-नगररचनाकार, वर्ग-2 ने.
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर अतिरीक्त कार्यभार नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर रा. मोती नगर, कन्हेरी रोड,
बोरा कापड षॉपच्या बाजुस, लातूर यांनी तक्रारदार यांचे मौजे मरषिवणी, ता. अहमदपुर जि. लातूर येथील सर्व्हे नं.
56 मधील 3600 चौरस मीटर क्षेत्रास वाणिज्य प्रयोजनार्थ जमीन विकासाची अंतिम परवानगी मिळणेकरीता
नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर येथे दाखल केलेल्या प्रकरणामध्ये अंतिम मंजुरी देण्याकरीता म्हणुन लोकसेवक
1) काकासाहेब सिध्देष्वर डोईफोडे 2) अजय विजयकुमार कस्तुरे यांनी मिळुन एकुण 7,00,000/-रू. लाचेची
मागणी करुन त्यापैकी 5,00,000/-रू. दि.14/02/2024 रोजी नगरपरिशद, अहमदपुर जि. लातूर कार्यालयाचे
पार्कीगमध्ये 16:30 वा. चे सुमारास पंचासमक्ष लोकसेवक क्र. 02 अजय विजयकुमार कस्तुरे यांनी स्विकारली
आहे. म्हणुन माझी वरील दोघांविरुध्द कायदेषिर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट
काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sudhakar ram dedhe(I (Inspector)) / pobn83693 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन अहमदपूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sudhakar ram dedhe
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobn83693